दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २७६

पाने : ०४, किंमत : ०३ रुपये

संपादक : विनोद कैलास गोरे

RNI NO. : MAHMAR/2022/82056

Follow Us On : www.aksharaj.in

Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.१८ मे २०२५


**सुविचार**

निघून गेलेला क्षण कधीच परत येत नाही, जे होऊन गेले त्याचा विचार करू नका, पुढे काय करू शकता याचा विचार करा...

## थोडक्यात

## खापरखेडा येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वात आज भव्य 'तिरंगा यात्रा'

### दिलीप बनसोड यांचे मोठ्या संख्येने तिरंगा यात्रेत सामील होण्याचे आवाहन




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१७, नागपूर :** ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात खापरखेडा येथे भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे. दिनांक १८ मे ला सकाळी ८.३० ते ९.३० वाजेपर्यंत ही यात्रा खापरखेडा आणि आजूबाजूचा परिसर पादाक्रांत करेल. भारत-पाकिस्तान युध्दाच्या पार्श्वभूमीवर आपल्या वीर जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, देशभक्तीचा संकल्प घेण्यासाठी आणि नागपूर जिल्ह्याच्या ऐक्याचे दर्शन घडवण्यासाठी या तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे.

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्य दलाचे अभिनंदन करण्यासाठी या भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे. देशभक्तीची व राष्ट्रप्रेमाची भावना या तिरंगा यात्रेच्या माध्यमातून प्रतीत व्हावी, यासाठी या तिरंगा यात्रेला विशेष महत्त्व आहे. नागपूर जिल्ह्यातील तमाम जनतेने या देशप्रेमाच्या यात्रेत तिरंगा हाती घेऊन सामील व्हावे, असे आवाहन खापरखेडा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप बनसोड यांनी केले आहे.

## भुजबळांना धमकावत एक कोटींची खंडणी मागितली



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, नाशिक :** माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते छगन भुजबळ यांना एक कोटी रुपयांची खंडणी मागितल्या प्रकार घडला आहे. आयकर विभागाचे अधिकारी असल्याचे सांगून खंडणी मागितली. तुमच्या फार्म हाऊस वर मोठ्या प्रमाणात पैसे आहेत. त्यामुळे आयकर विभागाची धाड पडणार आहे असे सांगितले. मी देखील त्या टीममध्ये आहे त्यामुळे तुम्हाला मदत हवी असल्यास. १ कोटी रुपये द्यावे लागेल असे सांगून खंडणी मागितली. छगन भुजबळ यांचे स्वीय सहायक संतोष गायकवाड यांच्य फिर्यादी वरून गुन्हा दाखल झाला होता. संशयित आरोपीला नाशिक पोलिसांनी नाशिक गुजरात महामार्गावरून करंजाळी येथून ताब्यात घेतले आहे. राहुल भुसारे या संशयित आरोपीला नाशिकच्या गुन्हे शाखा युनिट ने ताब्यात घेतले.

## भरधाव कारने कामगार नेत्याला चिरडलं... मुलासमोरच वडिलांचा भयानक अंत...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, छत्रपती संभाजीनगर :** कामानिमित्त दुचाकी घेऊन मुलाला घेऊन फुलंब्री गावाच्या दिशेने जात असताना रस्त्यात दुचाकी बंद पडली. दुचाकी बाजूला घेत असताना पाठीमागून आलेल्या भरधाव वेगातील कारने धडक दिली यात शासनाच्या गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त कामगार नेत्याचा मृत्यू झाला तर मुलगा गंभीर जखमी झाला आहे. ही घटना हरसुल रोडवरील फुलेनगर जवळ घडली.

अनिल अंबादास जावळे वय ६८ राहणार शिवनेरी कॉलनी असं अपघातात मयत झालेल्या कामगार नेत्याचं नाव आहे. या प्रकरणी स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, अनिल हे २४ वर्षांपूर्वी बंद पडलेल्या देवगिरी टेक्स्टाईल मिलमध्ये काम करत होते. तिथेच ते कामगार नेते देखील होते. अनिल जावळे यांच्या कामाची शासनाने दखल घेतली होती. त्यांना गुणवंत कामगार पुरस्कार देखील मिळाला होता. गेल्या काही दिवसांपासून जावळे हे आयटक अंगणवाडी, बालवाडी कर्मचारी संघटनेचे नेते म्हणून देखील काम करत होते.

दरम्यान, शुक्रवारी(१६ मे) रात्री कामानिमित्त अनिल जावळे हे मुलाला घेऊन दुचाकीने फुलंब्रीकडे जात होते. हर्सूल येथील फुलेनगर येथे जाताच जावळे यांची दुचाकी बंद पडली. दुचाकी बाजूला घेत असताना अचानक पाठीमागून भरधाव आलेल्या कारने जावळे यांच्या दुचाकीसह दोघांना धडक दिली. दोघेही गंभीर जखमी झाले होते. त्यांना स्थानिकांनी तात्काळ घाटी रुग्णालात दाखल केले. यावेळी अनिल जावळे यांना डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. तर मुलावर उपचार सुरू आहेत. अनिल जावळे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, नातवंड सून, जावई असा परिवार आहे. दरम्यान या अपघाताप्रकरणी हर्सूल पोलिस ठाण्यामध्ये नोंद करण्यात आली असून दुचाकीला धडक देणाऱ्या वाहनाचा शोध हर्सूल पोलीस करीत आहेत.




## २३ वर्षांच्या तरुणाने टोकाचं उचललं पाऊल...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, बुलडाणा :** बुलडाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील सैलानी नगर येथे राहणाऱ्या २३ वर्षीय नवाब शाह हारुण शाह या युवकाने गळफास लावून घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. चव्हाण पेट्रोल पंपाजवळ बुलडाणा रोडवर रात्री दोन ते तीन वाजताच्या दरम्यान ही घटना घडल्याचे समोर आले आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप गुलदस्त्यात आहे. मात्र या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नवाब शाह याला तातडीने उपजिल्हा रुग्णालय चिखली येथे पोस्टमॉर्टमसाठी नेण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि पुढील तपास सुरू केले आहे .आत्महत्येचे कारण शोधण्यासाठी पोलिसांनी परिसरातील लोकांकडे चौकशी देखील सुरू केली आहे. दरम्यान, नवाब शहा याच्या आत्महत्येमुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. एक तरुण अशा प्रकारे टोकाचे पाऊल उचलतो यामुळे समाज मनावर परिणाम करणाऱ्या गोष्टींबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांनी नवाबच्या मित्रांसोबतच कुटुंबीयांची देखील चौकशी सुरू केली असून त्याच्या मोबाईल मधील संभाषण व सोशल माध्यमांवर




देखील हालचालींची तपासणी केली जात आहे.दुसरीकडे, पिंपरी- चिंचवड पुन्हा एकदा हत्येच्या घटनेने हादरलं आहे. पिंपरी- चिंचवड परिसरातील मोशी येथील ग्रँड हॉटेलसमोर आज शनिवार (१७ मे) पहाटे तीन वाजताच्या सुमारास आर्थिक वादातून एका तरुणाची हत्या झाल्याची घटना समोर आली आहे. या तरुणाची धारधार शस्त्रने वार करून हत्या करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी पाच जणांवर गुन्हा दाखल करत त्यांना ताब्यात घेतलं आहे. ज्ञानेश्वर बर्गे असं खून झालेल्या व्यक्तीचं नावं असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी अशोक म्हाळसकर, रोहन म्हाळसकर, प्रसाद म्हाळसकर, अमोल निळे आणि संकेत जैद या पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना भोसरी एमआयडीसी पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती आहे. सध्या या प्रकरणाचा तपास सुरु आहे.

## ढगाळ वातावरण, उकाड्यामुळे मुंबईकर हैराण...

### राज्यात पुढील चार दिवस मेघगर्जनेसह पावसाची शक्यता

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, मुंबई :** सातत्याने तीन दिवस निर्माण झालेल्या ढगाळ वातावरणामुळे मुंबईकर हैराण झाले आहेत. पावसाची शक्यता वर्तवली जाते, मात्र त्याची फारशी हजेरी नसल्याने उकाड्यामुळे चिडचिड होत आहे. त्यातच दक्षिण कोकणात पावसाचा अनुभव येत असल्याने उत्तर मुंबईत पाऊस कधी येणार, याकडे मुंबईकरांचे लक्ष लागले आहे. मुंबईमध्ये शुक्रवारसाठीही यलो अलर्ट देण्यात आला होता. शहरात दिवसभर ढगाळ वातावरण होते. तसेच, आर्द्रताही ६८ ते ७० टक्के होती. सांताक्रूझ आणि कुलाबा दोन्ही केंद्रांवर अनुक्रमे ३४.४ आणि ३४.२ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले. तापमान आणि आर्द्रता यांमुळे मुंबईकरांना उकाड्याला सामोरे जावे लागले. अजिबातच पाऊस नसल्याने संध्याकाळीही या वातावरणापासून



दिलासा मिळाला नाही. मुंबईसाठी दिलेला इशारा हा मेघगर्जनेसाठी देण्यात आला होता, अशी माहिती प्रादेशिक हवामान विभागाच्या प्रमुख शुभांगी भुते यांनी दिली.

दोन दिवसांपूर्वीही मेघगर्जनेसह वाऱ्यांचा वेग वाढू शकतो या कारणासाठी 'यलो अलर्ट' देण्यात आला होता. अरबी समुद्रामध्ये चक्रीय वातस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी ढगाळ वातावरण दिसत आहे. या कालावधीत पावसाशिवायही मेघगर्जना, वाऱ्यांचा वाढलेला वेग याचा अनुभव येऊ शकतो. यासाठी हे अलर्ट देण्यात येत असल्याचे भुते यांनी सांगितले. या कालावधीत फारसा पाऊस अपेक्षित नाही. मुंबईत पुढील आठवड्यात हलक्या सरी, पावसाचा शिडकावा अपेक्षित आहे. यामध्ये फारसा तापमान बदल अपेक्षित नाही. राज्यभरात या आठवड्याच्या अखेरपासून पुढील आठवड्याच्या सुरुवातीपर्यंत मेघगर्जनेसह वारे आणि हलका ते मध्यम पाऊस असे वातावरण निर्माण होऊ शकते. पालघर आणि मुंबई वगळता ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या कोकण विभागातील इतर जिल्ह्यांमध्ये मंगळवारपर्यंत 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्रात नाशिक, अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, सांगली या जिल्ह्यांमध्ये मंगळपारपर्यंत 'यलो अलर्ट' कायम आहे. मराठवाड्यात लातूर, धाराशीव, बीड येथेही चारही दिवस मेघगर्जनेसह वाऱ्यांची उपस्थिती असू शकते. विदर्भामध्येही बहुतांश जिल्ह्यात मेघगर्जनेह वाऱ्यांचा वेग ४० ते ५० किलोमीटर असू शकेल, असा अंदाज आहे. शनिवारसाठी वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर या जिल्ह्यांना 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे.

संपादकीय

## खोल खोल पाणी...

पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानची पाणीकोंडी करण्याचे हरेक प्रयत्न भारताकडून होत आहेत. सिंधू जलवाटप करार स्थगित झाला. चिनाब नदीतून सीमेपलीकडे जाणारे पाणी रोखून शत्रूराष्ट्राच्या घशाला कोरड पाडण्याची योजना आहे.

झेलमवरील धरणांचे पाणी रोखणे हा द्राविडी प्राणायाम साध्य करण्यासाठी शक्ती पणाला लावली जात आहे. परिणामांचा अंदाज आल्याने सीमेपलीकडे आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरही गदारोळ होत आहे. एवढा सारा गंभीर मामला सुरू असताना, इकडे देशवासीयांना आणि त्यातही महाराष्ट्राला मात्र त्याच पाण्याबद्दल देणेघेणे नसल्याची स्थिती आहे. पाण्याच्या अनियंत्रित उपशाला आवर घालणे शक्य न झाल्याने म ार्चअखेरपर्यंत भूजल पातळी तीन मीटरपर्यंत खोल गेली आहे. एप्रिलची आकडेवारी अद्याप हाती आलेली नाही. जूनच्या पंधरवड्यापर्यंत उन्हाच्या तीव्रतेला सामोरे जायचे असल्याने हा धोक्याचा इशाराच म्हणावा लागेल.

उन्हाच्या झळा बसू लागल्या की, पाणीटंचाई आणि पाठोपाठ घटत्या भूजल पातळीची चर्चा ‘नेमेचि येतो पावसाळा’ (खरे तर इथे उन्हाळा) या उक्तीप्रमाणे ठरलेली. आधी बेफिकिरीने बेसुमार उपसा करायचा आणि टंचाई भासू लागली की चिंता आणि चिंतन करायचे. मान्सून दाखल झाला की पालथ्या घड्यावर पाणी, असा हा खेळ सुरूच असतो. चांगले पाऊसमान झालेले असल्याने यंदा तशी वेळ येणार नाही, असे साऱ्यांना वाटत होते. परंतु, वाढत्या तापमानापाठोपाठ पाण्याचा उपसा कायम राहिला.

मार्चमध्येच नद्या, तलाव, धरणांतील पाणी घटले. उत्तर महाराष्ट्रात ५४ पैकी ३७ तालुक्यांत भूजल पातळी दीड मीटरने घटली. पाच वर्षांची तुलना करता, अठरा नद्यांच्या खोऱ्यांत चिंताजनक स्थिती आहे. ‘सुजलाम सुफलाम’ अहिल्यानगर जिल्ह्यात दोन मीटरनी पाणी खालावले. गोदावरी, भीमा, सीना, मुळा, कुकडी आणि प्रवरा या सात नद्यांच्या पोटातील उपसा हे भूजल नष्ट करू पाहतो आहे. तापी, गिरणा, वाघूर, पांझरा, कान आदी नद्यांच्या खोऱ्यांतील चित्रही वेगळे नाही. शहरी व ग्रामीण भागांतही उधळपट्टी थांबायला तयार नाही.

पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही तालुक्यांत किमान दोन, तर कमाल पाच मीटरपर्यंत भूजल घसरले आहे. माणसाची जमिनीच्या पोटात शिरण्याची जणू स्पर्धाच लागली आहे. बोअरवेल्सच्या मशिनरींचा खणखणाट ऐकू येतो आहे. विहिरीतील खडकांवर छन्नी-हातोड्यांचे प्रहार पडत आहेत. कानठळ्या बसविणारे भूसुरुंगाचे बार धडकी भरवत आहेत. उन्हाळ्यात राज्यात किमान दहा ते पंधरा हजार विहिरींची भर पडणार आहे. शेतजमीन व औद्योगिकरणासाठी पाण्याचा अनियंत्रित उपसा, लहरी पाऊसमान, वाढते तापमान अशी प्रमुख कारणे भूजल ऱ्हासासाठी कारणीभूत आहेत. परंतु, प्रत्यक्षात जलस्रोत जिवंत ठेवणे व त्यांच्या पुनर्भरणाबाबत कमालीची अनास्था दिसून येते. लागवडीपेक्षा वृक्षतोडीचे प्रमाण अधिक असल्याने मृदेची धूप होत आहे. जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षम ता लोप पावते आहे. परिणामी, तापमान वाढत आहे. जमिनीच्या पोटातही घडामोडी घडून नवीच संकटे उभी ठाकत आहेत. ‘जमिनीला काही देणार, तर ती भूजल वा इतर रूपात परतफ ेड करणार,’ या सिद्धांताचा विसर पडतो आहे. ओरबाडण्याची वृत्ती थांबत नसल्याने जलदूतांसह पाणी चळवळीत काम करणाऱ्यांचेही प्रयत्न थिटे पडत आहेत. ‘जलयुक्त शिवार’सारख्या योजना निष्प्रभ ठरत आहेत, कागदोपत्री कोट्यवधी रुपये खर्च होत असले, तरी ते प्रत्यक्षात झिरपेनासे झाले आहेत. अजूनही वेळ गेलेली नाही. ‘सावध ऐका, पुढल्या हाका’ या उक्तीनुसार पाणीप्रश्नाबाबत वेगाने हालचाली व्हायला हव्यात. उपायांची जंत्री व वेग वाढायला हवा; अन्यथा, इतर कोणावरचा वा भविष्यात वगैरे राहू द्या; परंतु वर्तमान पिढीवरच ‘वॉटर स्ट्राइक’ उलटण्याची शक्यता अधिक!

# संग्रहालय दिन : ज्ञान आणि संस्कृतीचा उत्सव

दरवर्षी १८ मे रोजी जगभरातील संग्रहालयांचे महत्त्व शिक्षणाचा स्रोत आणि लोकांना त्यांच्या भूतकाळाशी आणि इतिहासाशी जोडणारे साधन म्हणून जागरूकता निर्माण करण्यासाठी ‘आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिन’ साजरा केला जातो. हा दिवस संग्रहालये आणि त्यांच्या कलाकृतींबद्दल लोकांना शिक्षित करण्यासाठी साजरा केला जातो. १९७७ पासून आंतरराष्ट्रीय संग्रहालय परिषद दरवर्षी १८ मे रोजी एक थीम निवडते, ज्याम ध्ये पर्यावरणीय काळजी, जागतिकीकरण, संस्कृतीतील अंतर भरून काढणे आणि स्थानिक लोक यांचा सम ावेश असतो. दरवर्षी अनोख्या थीमसह ‘आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिन’ आयोजित करून आंतरराष्ट्रीय संग्रहालय समुदायाला आदरांजली वाहत आहे, जो एक जागतिक कार्यक्रम आहे. या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनाची थीम ‘झपाट्याने बदलणाऱ्या समुदायांमध्ये संग्रहालयांचे भविष्य’ अशी आहे. ज्यात संग्रहालये कसा बदलत्या सामाजिक, तांत्रिक आणि पर्यावरणीय वातावरणाशी जुळवून घेतात, याचा विचार केला जाईल. ही थीम संग्रहालयांच्या सांस्कृतिक ओळखीचे आवश्यक कनेक्टर, नवोन्मेषक आणि व्यवस्थापक म्हणून भूमिका अधोरेखित करते. तसेच हा दिवस संग्रहालयांच्या समाजातील महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकतो आणि लोकांना संग्रहालयांमध्ये काय आहे आणि त्यांचे महत्त्व काय आहे, याची जाणीव करून देतो.



संग्रहालये ही भूतकाळाची खिडकी आहेत, जी भविष्यातील पिढ्यांसाठी इतिहास, संस्कृती आणि सर्जनशीलता जपतात. दरवर्षी संग्रहालये आणि त्यांच्या कलाकृतींबद्दल लोकांना शिक्षित करण्यासाठी ‘आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिन’ साजरा केला जातो. या दिवशी संग्रहालयशास्त्रज्ञ सामान्य लोकांशी भेटून बौद्धिक जीवन समृद्ध करणाऱ्या आणि शिकण्यासाठी आणि कुतूहलासाठी सामुदायिक जागा वाढवणाऱ्या आधुनिक संस्था म्हणून संग्रहालयांच्या भूमिकेवर चर्चा करतात.

प्रसिद्ध चित्रांपासून ते सुंदर शिल्पांपर्यंत, जगातील संग्रहालये मानवजातीच्या इतिहासाचे संकलन, जतन, प्रदर्शन आणि अंतर्दृष्टी प्रदान करत आहेत. हा दिन सम ाजात संग्रहालयांच्या महत्त्वाबद्दल जागतिक जागरूकता वाढविण्यात, सांस्कृतिक देवाणघेवाण, शिक्षण आणि समज आणि शांतता वाढविण्यात त्यांची भूमिका अधोरेखित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. हा कार्यक्रम कलाकृतींच्या बेकायदेशीर तस्करीच्या परिणाम ाकडे देखील लक्ष वेधतो.

आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनानिमित्त अनेक गोष्टी करता येतात. जसे संग्रहालयात जाणे, या दिवशी संग्रहालयांना भेट दिल्याने आपल्या जीवनात त्यांचे महत्त्व समजण्यास मदत होईल. तसेच, प्रदर्शनांद्वारे या प्रदेशाची संस्कृती, वारसा आणि इतिहास जाणून घेता येईल. त्याचप्रमाणे संग्रहालयात स्वयंसेवा केल्याने मौल्यवान अनुभव मिळेल आणि त्याच्या शैक्षणिक ध्येयाला पाठिंबा मिळेल. आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनानिमित्त विशेष कार्यक्रम, प्रदर्शने आणि मार्गदर्शित टूर किंवा व्हर्च्युअल टूर आयोजित केले जातात. जर कुणाला लांब रांगेत उभे राहायचे नसेल, तर ते संग्रहालयाला भेट देऊ शकतात. संग्रहालयांबद्दल जाणून घेण्यासाठी आणि प्रदर्शनांचा आणि परिणामांचा आनंद घेण्यासाठी व्हर्च्युअल टूर हा एक उत्तम मार्ग आणि सर्जनशील कला आहे. या दिवशी आवडत्या शैली किंवा कला चळवळींपैकी एकामध्ये कलाकृती तयार करण्यासाठी स्वतःला आव्हान देऊन आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनानिमित्त आयोजित कार्यशाळा आणि स्पर्धांमध्ये सहभागी व्हायला हवे. या दिनानिमित्त नियोजित कार्यक्रम आणि उपक्रम एक दिवस, एक आठवड्याचा शेवट किंवा संपूर्ण आठवडा टिकू शकतात. आज जागतिक संग्रहालय दिनी सर्वांना मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा !

**– प्रविण बागडे, नागपूर**
**९९२३६२०९१९**

# खा. प्रतिभा धानोरकर यांचे शेतकऱ्यांच्या न्यायासाठी निर्णायक पाऊल

## शेतकऱ्यांच्या शिल्लक जमिनी अधिग्रहित करण्याची मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** वणी क्षेत्रातील गाडेगाव, खैरगाव, टाकळी, चिखली आणि सोनुर्ली या गावातील शेतकऱ्यांची जमीन पैनगंगा प्रकल्पाच्या अनुषंगाने अधिग्रहित कपण्यात आली आहे.

मात्र, काही शेतकऱ्याच्या जमिनी अदाप अधिग्रहण प्रक्रियेत समाविष्ट झालेल्या नाहीत. यामुळे भविष्यात त्यांच्या पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच त्यांना आर्थिक व सामाजिक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. या पार्श्वभूमीवर, चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघाच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडचे (वेकोलि) व्यवस्थापकीय संचालक जयप्रकाश द्विवेदी यांच्याशी नागपूर येथे बैठक घेऊन चर्चा केली.



या बैठकीस कॅाग्रेसचे जिल्हाधक्ष तथा माजी आमदार सुभाष धोटे, निर्देशक (कार्मिक) हेमंत पांडे, जी. एम. (आयआर), जी. एम. (भुराजस्व) तसेच संबंधित भूधारक शेतकरी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान खासदार धानोरकर यांनी लेखी मागणी सादर करत स्पष्ट केले की, वणी क्षेत्रातील उरणा खंड क्र. १ ची जमीन निलजई डीप विस्तार प्रकल्पासाठी अधिग्रहित करण्यासंदर्भात चर्चा झाली असून पैनगंगा प्रकल्पाच्या अनुषंगाने वरील गावातील जमिनीही तातडीने अधिग्रहित करण्यास परवानगी देण्यात यावी. खासदार धानोरकर म्हणाल्या,’ स्थानिक शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करणे हे माझे सर्वोच्च प्राधान्य आहे. त्यामुळे या संदर्भात तात्काळ निर्णय घेऊन शेतकऱ्यांच्या समस्या दूर कराव्यात.

या बैठकीत वेकोलि कामगारांच्या पदस्थापना, रोजगार आणि शैक्षणिक पात्रतेनुसार नेमणूक या मुद्द्यांवरही सविस्तर चर्चा झाली. वेकोल्च्या व्यवस्थापनाने या सर्व मुद्द्यांवर सकारात्मक कारवाई केली जाईल, असे आश्वासन यावेळी दिले.

## दया मरण..

अति क्लिष्ट निर्णय
संमतीने दया मरण
सोपे नसते कधीही
मृत्युला जाणे शरण

विचीत्र घातक योग
स्वताचे रचणे सरण
असाध्यदुर्धरता रोग
मृत्यु स्वागता तोरण

असह्य होतातवेदना
जगण्याचे चीर हरण
चिरविश्रांती घ्यायची
स्मशानी चाले चरण

कायद्याचा गुंतावळा
अडथळे ते अ कारण
मरणप्राय वेदना होई
संमतीपत्र हस्तांतरण

ठरवणारं नाते वाईक
लाईफसपोर्टचे धोरण
अस्वस्थमानसस्थिती
भावनांचे फुटतेधरण

वेळ येऊनये शत्रुसही
मागायची इच्छामरण
तुझ्याहाती ठेव अस्त्र
शिव शंकरा नारायण

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# भारतीय कसोटी संघाचा संक्रमणकाळ

पुढील महिन्यात भारतीय क्रिकेट संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर जाणार असून या दौऱ्यात भारतीय क्रिकेट संघ इंग्लंड सोबत ५ कसोटिंची मालिका खेळणार आहे.

भारतासाठी हा दौरा खूप महत्वाचा आहे कारण या दौऱ्यापासून भारत विश्व कसोटी चॅम्पियनशिपची सुरुवात करणार आहे. या दौऱ्यानंतर भारत ऑस्ट्रेलियाचाही दौरा करणार आहे. ऑस्ट्रेलियन दौऱ्याची पायाभरणी या दौऱ्यातून होणार आहे. मागील इंग्लंड दौऱ्यात भारताला मानहानीकारक पराभव स्वीकारावा लागला होता त्याचे उट्टे भारत काढणार का ? या प्रश्नाचे उत्तरही या दौऱ्यात मिळणार आहे. एकूणच भारतीय क्रिकेट संघ या दौऱ्याने क्रिकेटच्या नव्या हंगामाची सुरुवात करणार आहे मात्र हा दौरा भारतासाठी वाटतो तितका सोपा नाही कारण सध्या भारतीय कसोटी संघ संक्रमनातून जात आहे. भारताचे दिग्गज आणि मॅच विनर खेळाडू असलेल्या रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी कसोटीतून नुकतीच निवृत्ती घेतली आहे. त्याआधी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असताना भारताचा सर्वोत्तम फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विन यानेही कसोटीतून निवृत्ती स्वीकारली होती. रोहित, विराट आणि अश्विन हे भारताचे खेळाडू जागतिक क्रिकेटमध्ये महान खेळाडू म्हणून गणले जातात. या तींघानी मागील दीड दशकात भारतीय क्रिकेटची धुरा आपल्या खांद्यावर यशस्वीपणे सांभाळली. या तिघांनी भारताला अनेक अविस्मरणीय विजय मिळवून दिले. आज भारत कसोटीत अव्वल स्थानी आहे त्याचे श्रेय या तिघांनाच जाते. हे तिघेही भारतीय कसोटी संघाचे केवळ अविभाज्य घटकच नव्हते तर संघाचे आधारस्तंभ होते. त्यांच्या निवृत्तीने भारतीय संघात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ते नसल्याने बलाढ्य भारतीय संघ कुमकुवत वाटू लागला आहे. इंग्लंड सारख्या महत्वाच्या दौऱ्यावर त्यांची अनुपस्थिती भारताला नक्कीच जाणवेल मात्र यातूनही भारतीय क्रिकेटला मार्ग काढावा लागेल. अर्थात भारतीय क्रिकेट संघावर अशी वेळ पहिल्यांदाच आली आहे असे नाही. २००० साली जेंव्हा मॅच फिक्सिंग प्रकरण उघडकीस आले तेंव्हा संघातील ज्येष्ठ खेळाडूंना घरचा रस्ता दाखवण्यात आला. संघात अनेक नवोदित खेळाडूंचा समावेश करण्यात आला. सौरभ गांगुलीकडे संघाची धुरा सोपवण्यात आली. त्याने सचिन, द्रविड, लक्ष्मणला सोबत घेऊन संघाची बांधणी केली. गांगुलीने वीरेंद्र सेहवाग, हरभजनसिंग, युवराज सिंग, जहीर खान, धोनी या युवा खेळाडूंना घेऊन संघाला उभारी दिली आणि पुढील दशकभर भारताने क्रिकेट विश्वावर अधिराज्य गाजवले.

त्यानंतर २०१० ते २०१३ या कालावधीत सौरव गांगुली, राहुल द्रविड, सचिन तेंडुलकर, लक्ष्मण, वीरेंद्र सेहवाग, अनिल कुंबळे, युवराज सिंग, हरभजन सिंग जहीर खान हे दिग्गज खेळाडू निवृत्त झाले मात्र महेंद्रसिंग धोनीने रोहित शर्मा, विराट कोहली, रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, शिखर धवन, जसप्रीत बुमरा या युवा खेळाडूंना हाताशी धरून संघाची बांधणी केली पुढे या संघानेही दशकभर क्रिकेटविश्वावर अधिराज्य गाजवले. आताही भारतीय संघावर तीच वेळ आली आहे. रोहित, विराट आणि अश्विनच्या निवृत्तीनंतर भारतीय संघाची नव्याने बांधणी करण्याची वेळ आली आहे. बीसीसीआय आणि निवड समिती त्यासाठी काळजीपूर्वक पावले टाकत आहे भारतासाठी सर्वात महत्वाचा आणि मोठा प्रश्न आहे की या नव्या संघाचा कर्णधार कोण असेल ? भारतीय संघाच्या नव्या कर्णधाराच्या शर्यतीत शुभमन गिल, ऋषभ पंत आणि जसप्रीत बुमरा हे तिघे आहेत. यात बुमरा ज्येष्ठ असून त्याच्या पाठीशी मोठा अनुभव आहे मात्र बुमराची दुखापत हा चिंतेचा विषय आहे. दुखापतीमुळे तो पूर्ण मालिका खेळेल हे देखील कोणी सांगू शकत नाही त्यामुळेच त्याचा विचार कर्णधार म्हणून होईल असे वाटत नाही. ऋषभ पंत हा आतताई क्रिकेटर आहे. कसोटीत लागणारा संयम त्याच्याकडे नाही त्यामुळे युवा शुभमन गिल हाच भारतीय कसोटी संघाचा नवा कर्णधार असेल असे वाटते. शुभमन गिल २५ वर्षाचा आहे शिवाय त्याच्याकडे नेतृत्वगुण आहेत.

आयपीएलमध्ये त्याने गुजरात टायटन्स या संघाचे नेतृत्व ज्याप्रकारे केले आहे ते पाहून सर्वजण प्रभावित झाले आहेत. सर्वांना सोबत घेऊन जाण्याची कला त्याच्याकडे आहे शिवाय प्रशिक्षक गौतम गंभीरचाही त्याच्या नावाला पाठिंबा आहे त्यामुळे तोच भारताचा नवा कर्णधार असेल अशी दाट शक्यता आहे. आता निवड समिती त्याला कसा संघ देतील हे पाहावे लागेल. के एल राहुल, ऋषभ पंत आणि जसप्रीत बुमरा या अनुभवी खेळाडूंना सोबत घेऊन निवड समिती देईल त्या नवोदित खेळाडूंना घेऊन गिलला संघ बांधणी करावी लागेल. जे काम सौरभ गांगुली आणि धोनीने केले तेच काम शुभमन गीलला करावे लागेल. त्यात जर तो यशस्वी झाला तर तो देखील भारताचा यशस्वी कर्णधार ठरेल भारतीय कसोटी क्रिकेट संघ पूर्वीसारखा क्रिकेट विश्वावर अधिराज्य गाजवेल यात शंका नाही.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## श्रीक्षेत्र सावता माळी महाराज संजीवन समाधीस अ वर्ग दर्जा देण्यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, ठाणे :** श्रीक्षेत्र संत शिरोमणी सावता माळी महाराज संजीवन समाधी, अरण, ता. माढा, जि. सोलापूर या तीर्थक्षेत्रास विशेष बाब म्हणून तीर्थक्षेत्राचा अ वर्ग दर्जा या बाबतचा शासन निर्णय ग्राम विकास विभागामार्फत १३ मे २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांना मान्यता देण्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिखर समितीची बैठक घेण्यात आली होती. या शिखर समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार श्रीक्षेत्र संत शिरोमणी सावता माळी महाराज संजीवन समाधी, अरण, या तीर्थक्षेत्रास 'अ' वर्ग देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार या बाबतचा शासन निर्णय ग्राम विकासाने निर्गमित केला असून हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्याचा संकेतांक २०२५०५१३१४४५०९०५७७२० असा आहे.

## बारडमध्ये शेतीच्या वादातून राजू देशमुख यांचा खुन !
## भावाने भावाचा काटा काढल्याची पत्नीची फिर्याद

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१७, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील बारड येथील वडीलोपार्जित शेती वादातून डोक्यात दगड घालून राजू जानकीराम देशमुख यांचा खुन केल्याची घटना काल दि.१६ शुक्रवारी रोजी दुपारी १ च्या सुमारास घडली असुन पत्नी मयुरी राजू देशमुख यांच्या फिर्यादी वरून चार जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना ताब्यात घेतले असुन महिला आरोपी फरार आहे.

बारड मध्ये वडीलोपार्जित शेतीच्या वाटणी वरून तीन भावा भावा मध्ये वाद नेहमीच वाद चालू होते. गावात अनेक वेळा मध्यस्थी करून वाद मिटवण्याचाही झाला होता. परंतु वाद काही मिटता मिटेना, त्यामुळे अनेकदा भांडणे झाली. त्याच्या तक्रारी पोलीस ठाण्यात दाखलही झाल्या. या प्रकरणात न्यायलयात दाद मागण्यात आली. काही दिवसांपूर्वी गावातील प्रमुखांनी वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करूनही भावा भावातील वाद अखेर राजू देशमुख यांच्या जीवावर बेतला आणि त्यांची हत्या करण्यात आल्याची घटना घडली.

शीतला देवीच्या मागच्या शेतात पावसाळ्याच्या पेरणी अगोदरची मशागत करण्यासाठी राजू जानकीराम देशमुख ट्रॅक्टर घेऊन शेती गेले होते. ट्रक्टरची मशागत चालू असताना दि १६ मे, शुक्रवार रोजी दुपारी १२. ३० वाजताच्या सुमारास आरोपी चंद्रकांत जानकीराम देशमुख, सूर्यकांत जानकीराम देशमुख, शिल्पा चंद्रकांत देशमुख, उमेश चंद्रकांत देशमुख रा. देशमुख गल्ली, बारड आरोपीनी संगनमत करून राजू जानकीराम देशमुख यांना शेतातून बाहेर निघा, आज तुला सोडणार नाही म्हणून शिवीगाळ केली अशी फिर्याद मयुरी राजू देशमुख यांनी पोलिसांना दिली. यावेळी आरोपींना लाथा बुक्याने मारहाण करत राजूस खत्म करून टाका म्हणत राजू देशमुख यांच्या डोक्यात दगड घातला व यात राजू देशमुख यांचा खुन झाल्याची फिर्याद मयुरी देशमुख यांनी दिली. या खुन प्रकरणी कलम १०३, ११५,३५१(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बारड पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संतोष केदासे यांच्या कडे देण्यात आला आहे. ग्रामीण चे पोलीस उपविभागीय अधिकारी सुशीलकुमार नायक यांनी यासंबधी घटना स्थळी भेट दिली.

## अंजुमन हायस्कूल ॲण्ड् ज्यु कॉलेज विद्यार्थ्यांचे दैदिप्यमान यश

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१७, महाबळेश्वर :** १२वी व १० वी चा निकाल जाहीर झाला असून अंजुमन खैरुल इस्लाम ऊर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विज्ञान(१००%), कला (९४ .११ %) आणि वाणिज्य(९३.७५%) शाखेचा निकाल लागला आहे. **कलाविभाग** – प्रथम क्रमांक मन्तशा मुस्तफा डांगे (६१.३३%) द्वितीय क्रमांक जीनत नसीम अन्सारी (५३.६७%) तृतीय क्रमांक रोजी परवीन जहांगीर आलम अन्सारी (५३%) **वाणिज्य विभाग** – प्रथम क्रमांक आर्शिया साजीद वारुणकर (७८.३३%) द्वितीय क्रमांक मिसबा मजीद पटेल (७०.६७%) तृतीय क्रमांक शिफा नजीरअन्सारी (५६.६७%) **विज्ञान विभाग** – प्रथम क्रमांक सिमरन फकीर मोहम्मद वारूणकर ७६.८३%)द्वितीय क्रमांक तस्मीया कासम शेख (६२.३३ %) तृतीय क्रमांक मोहम्मद रिहान गुलाब डांगे (६०.५०%) तसेच दहावीच्या परिक्षेत पुढील प्रमाणे विद्यार्थ्यानी यश प्राप्त केले आहे. प्रथम क्रमांक इर्शाद सोहान शेख (८४.६०%) द्वितीय क्रमांक रेहान मोहम्मद मंजूर अहमद अन्सारी (७७. ६०% तृतीय क्रमांक बुशरा साबीरअली वलगे (७६.२०%) प्रथम श्रेणीत – १६ विद्यार्थी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी उत्तम गुण मिळवून यश संपादन केले.

## पारनेर आगाराला मिळणार ५ नवीन लालपरी ; आ.दाते यांच्या प्रयत्नांना यश

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१७, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर आगारातील बसची कमतरता लक्षात घेवून आमदार काशिनाथ दाते यांनी पारनेर आगारासाठी पारनेर तालुक्यातील सार्वजनिक प्रवासी वाहतूक सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पारनेर आगाराकरिता २५ नवीन बसेसची मागणी परिवहन मंत्री ना. प्रतापराव सरनाईक यांचे कडे केली होती. सदर बसेस टप्याटप्याने देण्यात येतील असे आश्वासन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या महाव्यवस्थापकांनी आमदार दाते यांना दिले होते. शासनाकडे पाठपुरावा केल्याने पाच नवीन बस पारनेर आगाराला उपलब्ध झाल्या असून उद्या रविवार, दि. १८ मे २०२५ रोजी सकाळी साडे आठ वाजता या बसचे आमदार दाते, महायुतीचे पदाधिकारी व आगाराच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पुजन व लोकार्पण करण्यात येणार आहे.



### आणखी ५ बस लवकरच मिळणार

मागणी असलेल्या २५ बस पैकी आज पाच बस उपलब्ध झाल्या असून या टप्प्यातील ५ बस लवकरच आगाराला प्राप्त होणार असून उर्वरित १५ बस मिळणेसाठी पाठपुरावा करणार. पारनेर व सुपा आगाराच्या विस्तारीकरणासाठी शासन दरबारी पाठपुरावा सुरु आहे, त्यालाही लवकरच यश मिळेल.

**– आ. काशिनाथ दाते**

पारनेर आगारातून राज्यात लांब पल्ल्याची बस सेवा असून बसची संख्या कमी असल्याने त्याचा परिणाम प्रवाशी सेवेवर होत होता. प्रवाशांच्या अनेक तक्रारी आमदार दाते यांच्याकडे येत होत्या त्याची दखल घेऊन तसेच प्रवाशांना अधिक चांगली प्रवाशी सेवा पुरविण्याबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. त्यावेळी प्रवाशी संख्या अधिक असून बस संख्या कमी असल्याने किमान २५ बस मिळाव्यात अशी मागणी आमदार दाते यांच्याकडे करण्यात आली होती. याची दखल घेत आमदार दाते यांनी शासनाकडे २५ बसची मागणी करुन पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून पाच नवीन बस पारनेर आगाराला प्राप्त झाल्या आहेत. या बसचा लोकार्पण सोहळा उद्या सकाळी साडे आठ वाजता आमदार दाते यांच्या हस्ते व महायुती पदाधिकारी व आगाराच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

## धनगर समाजातील विद्यार्थ्यांनी इंग्रजी शाळेत प्रवेशासाठी १५ जून पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१६, खंडाळा (सातारा) :** इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांकरीता शहरातील इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे या योजनेअंतर्गत सातारा जिल्हयामध्ये गुरुकृपा कॉन्व्हेंट स्कूल पाचगणी ता. महाबळेश्वर, पाचगणी इंटरनॅशनल स्कूल पांचगणी ता. महाबळेश्वर व ब्लू डायमंड इंग्लिश मिडीयम स्कूल लोणंद, ता.खंडाळा या तीन शाळांना नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळा म्हणून शासनाकडून मान्यता देण्यात आलेली आहे. तरी या शाळांमध्ये धनगर समाजातील विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा असे



आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहायक संचालक डॉ. कांचन जगताप यांनी केले आहे.

सन २०२५-२६ वर्षाकरीता सदर शाळांमध्ये मोफत प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली असून प्रवेशाकरीता अर्जासोबत विद्यार्थ्यांचे जन्म प्रमाणपत्र,जातीचे प्रमाणपत्र,आधारकार्ड व पालकांचे रक्कम रु.१ लक्षच्या मर्यादेतील उत्पन्नाचा दाखला इ.कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. प्रवेश प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना निवास,भोजन व्यवस्था,शैक्षणिक साहित्य इ.सर्व सुविधा मोफत पुरविल्या जाणार आहेत.तसेच विद्यार्थ्यांना सदर शाळांमधील अन्य प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसमवेत एकत्रितपणे शिक्षण दिले जाणार आहे. तसेच शाळांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या इ. १ली ते ८वी च्या विद्यार्थ्यांकरीता प्रवेश मंजूर करण्यात येईल व पुढे इ. १२ वी पर्यंत मोफत शिक्षणाचा लाभ अनुज्ञेय राहिल.

तरी सदर योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी धनगर प्रवर्गातील इ. १ ली ते ८ वी मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाकरीता त्यांच्या पालकांनी १५ जून पर्यंत सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय सातारा, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक,सातारा येथे ऑफलाईन पद्धतीने अर्ज दाखल करावेत.

## बोबापाडा येथे नव्याने बांधलेली जिल्हा परिषद शाळा इमारत उद्घाटन उत्साहात संपन्न

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१६, तलासरी (पालघर) :** तलासरी नगरपंचायतच्या हद्दीतील बोबापाडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या नव्या इमारतीचे उद्घाटन आमदार कॉ. विनोद निकोले यांच्या हस्ते आज उत्साहात पार पडले. यावेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

गेल्या दोन वर्षांपासून बोबापाडा येथील विद्यार्थ्यांना भाड्याच्या खोलीत शिक्षण घ्यावे लागत होते. त्यामुळे शाळेची स्वतःची इमारत असावी, ही ग्रामस्थांची आणि पालकांची




दीर्घकाळची मागणी अखेर पूर्ण झाली आहे. आज नव्या इमारतीच्या कामास सुरुवात झाल्याने विद्यार्थी आणि शाळा प्रशासनाने आमदार निकोले यांचे मनः पूर्वक आभार मानले. शाळा व्यवस्थापन समितीने ग्रामस्थांच्या संमतीने शाळेसाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून दिली. मुख्याध्यापक, शिक्षक आणि शाळा समितीने पंचायत समितीकडे सातत्याने पाठपुरावा केल्यामुळेच हा प्रकल्प प्रत्यक्षात उतरला, असे यावेळी बोलताना मान्यवरांनी सांगितले.

या उद्घाटन समारंभप्रसंगी गटविकास अधिकारी वैभव साबळे, नगराध्यक्ष सुरेश भोये, उपनगराध्यक्ष कॉ. सुभाष दुमाडा, नगरसेवक कॉ. शंती मलावकर, कॉ. सुहास मूर्ती, कॉ. विलास ठाकरे, गटशिक्षण अधिकारी मोहिते, माजी सरपंच कॉ. सुभाष मलावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार ठरले. नव्या इमारतीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि सुरक्षित शिक्षण सुविधा मिळणार असून, या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

## सराईत टोळ्यांवर ठाणे पोलिसांचा मोठा घाव : २९ गुन्ह्यांची उकल, ३६.२९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१६, कल्याण (ठाणे) :** ठाणे शहर व नवी मुंबई परिसरात गेल्या काही महिन्यांपासून चेन स्नॅचिंग, वाहन चोरी, दरोडे व घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. या गुन्ह्यांमुळे सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनांचा तपास करण्यासाठी ठाणे गुन्हे शाखा, घटक-३, कल्याणच्या पथकाने विशेष मोहिम राबवून सराईत इराणी टोळी व शिकलगार टोळीच्या सदस्यांना अटक केली आहे.

**अटकेत आरोपी पुढील प्रमाणे-**

१. वसीम युसुफ अली सय्यद उर्फ वसिम काला (३०)
२. कौसर युसुफ अली जाफरी उर्फ बुशी (३३)
३. शिवासिंग अमिरसिंग बावरी (२५)
४. पुनमकौर अमिरसिंग बावरी (३७)

या आरोपींच्या चौकशीत एकूण २९ गुन्ह्यांची उकल झाली असून, त्यामध्ये चेन स्नॅचिंगचे २० गुन्हे, दरोड्याचा




१ गुन्हा, मोटार वाहन चोरीचे ५ गुन्हे व घरफोडीचे ३ गुन्ह्यांचा समावेश आहे. आरोपींकडून ३६,२९,७२५ रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व ६ चारचाकी वाहने हस्तगत करण्यात आली आहेत.

**सदर गुन्हे खालील पोलीस ठाण्यांमध्ये नोंदवलेले होते –**

**ठाणे** : राबोडी, ठाणे नगर, वागळे इस्टेट, कापुरबावडी, चितळसर, कळवा, कोपरी, मुंब्रा, शांतीनगर, शिवाजी नगर

**कल्याण** : कोळशेवाडी, बदलापूर पूर्व/पश्चिम, अंबरनाथ

डोंबिवली, टिळकनगर, मानपाडा, हिललाईन

**नवी मुंबई** : कामोठे, कळंबोली

या विशेष मोहिमेचे नेतृत्व मा. पोलीस आयुक्त . आशुतोष डुंबरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) पंजाबराव उगले, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव, सहायक पोलीस आयुक्त (शोध-१) शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या यशस्वी कारवाईसाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे व त्यांच्या पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

## केळठण (वज्रेश्वरी) येथे निवासी बाल संस्कार शिबिर संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, वाडा (पालघर) :** संत श्री ज्ञानोबा तुकोबा सत्संग सेवा संस्था, आळंदी सारशी (वाडा) यांच्या माध्यमातून हभप राजेश महाराज बांगर यांच्या पुढाकाराने केलठण (वज्रेश्वरी) येथील सरस्वती गणपत पाटील विद्यालय येथे भव्य निवासी बाल संस्कार शिबीराचे आयोजन दिनांक ४ मे ते १५ मे २०२५ या कालावधीत करण्यात आले होते. गुरुवार दिनांक १५ मे २०२५ रोजी सायंकाळी हभप रमाकांत महाराज शास्त्री यांचे सुश्राव्य कीर्तन पार पडले. सलग ५व्या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या ह्या शिबिराचा सांगता समारंभ शुक्रवार दिनांक १६ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झाला. यावेळी केळठण व परिसरातील ग्रामस्थ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थीत होती. यावेळी व्यासपीठावर हभप प्रतिभाताई पाटील, हभप यशवंत पाटील, हभप संतोश महाराज देसले, हभप साळुंखे महाराज, हभप रामचंद्र बाबा नाईक (श्रीनित्यानंद बाबांचे मानसपुत्र), हभप रामचंद्र बाबा पाटील, श्री कमलाकर पाटील सर, हभप नारायण बाबा पाटील, महेश बांगर, संजय बांगर, सरस्वती गणपत पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय पाटील, लेखक व जॉय संस्थेचे सामाजिक



कार्यकर्ते वैभव पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. आजच्या मोबाईलच्या युगात संस्कारक्षम पिढी घडवण्यासाठी बाल संस्कारांची नितांत गरज असुन त्यासाठी पालकांचे योगदान व इच्छाशक्ती फार महत्वाची असल्याचे हभप राजेश म बांगर यांनी सांगीतले. कलियुगाच्या भयानक वातावरणामध्ये लहान मुले संस्कारहीन बनत चालली आहे. अशा वातावरणामध्ये तरुण पिढी आई-वडिलांना मानायला तयार नाही, म्हणून बाल मनावर चांगल्या संस्काराची जडण घडण होण्यासाठी संत अध्यात्मिक चिंतनाची आणि सहवासाची अत्यंत गरज आहे व हा हेतू अंतकरणामध्ये ठेवून गेल्या ४ वर्षापासून बाल संस्कार निवासी शिबिराचे आयोजन करत असल्याचे हभप बांगर महाराज यांनी सांगितले. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना योगासने, भगवद्गीता, विष्णुसहस्रनाम, गायन, वारकरी गायन, मृदंग वादन, हरिपाठ आदी शिक्षण देण्यात आले.

हभप राजेश म बांगर यांच्या ह्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करत त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही याप्रसंगी सर्वच ग्रामस्थ मान्यवरांनी दिली. बाल संस्कार शिबीर भरवणे सहज सोपे नसून त्यासाठी मोठा संघर्ष व त्याग करावा लागतो असे मत वैभव पाटील यांनी व्यक्त करत त्यांचे महत्व लक्षात घेता अशा प्रकारची शिबिरे गावोगावी आयोजित करणे अत्यावश्यक झाल्याचेदेखील त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थी हा वाचनप्रिय असावा असे सांगत विद्यार्थ्याने पुस्तकी धड्यांव्यतिरिक्त अवांतर वाचनावर लक्ष केंद्रित करून शब्दसाठा व बाहेरील जगाचे ज्ञान आत्मसात करावे असेही पाटील यांनी सांगितले. शिबिर यशस्वी करण्यासाठी हभप राजेश महाराज बांगर, हभप काशीनाथ महाराज पटारे, हभप सुधाकर महाराज अवचार, हभप साळुंखे महाराज इत्यादी आयोजकांनी अथक परिश्रम घेतले. समारोप कार्यक्रमाप्रसंगी मुलांना वैभव पाटील यांच्यातर्फे प्रमाणपत्रे, मेडल्स, स्पर्धासाहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. निवासी बाल संस्कार शिबीर यशस्वी करण्यासाठी तन, मन, धनाने योगदान दिलेल्या सर्वांचे तसेच केळठण ग्रामस्थांचे हभप बांगर महाराजांनी आभार मानले. भोजन व फराळाने सदर कार्यक्रमाचा शेवट झाला.

# पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ

## एफटीके मोहिमेमुळे नागरिकांना मिळणार शुध्द पिण्याचे पाणी




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** राज्य शासनाच्या निर्देशानुसार ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची रासायनिक व जैविक पाणी गुणवत्ता तपासणी करण्यासाठी दिनांक १२ मे ते ७ जून २०२५ रोजी या कालावधीत क्षेत्रीय तपासणी संचाद्वारे पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती मोहिम जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. नागरिकांना सुरक्षित व स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे. यासाठी जिल्ह्यातील १ हजार ४०० गावांमध्ये ही मोहिम प्रभावीपणे राबवण्याचे आवाहन जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकीत सिंग यांनी केले आहे.

एफटीके संचाद्वारे पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती मोहीम ही ग्राम पंचायत विभाग, महिला व बालकल्याण विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग व पाणी पुरवठा विभागाच्या सहभागातून यशस्वी केली जाणार आहे. या मोहिम ेच्या जिल्हास्तरीय शुभारंभ कार्यक्रमात पुलकीत सिंग यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी जलजीवन मिशनचे प्रकल्प प्रमुख नूतन सावंत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अशोक कटारे, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा गिरीश धायगुडे, वरिष्ठ भुवैज्ञानिक लीना बाराहाते, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय धोटे, पाणी गुणवत्ता तज्ञ अंजली डाहुले, तसेच जिल्हा पाणी व स्वच्छता विभागातील सल्लागार व कर्मचारी शुभारंभाला उपस्थित होते. जैविक क्षेत्रीय तपासणी (एफटीके) संचाद्वारे गावांमध्ये जनजागृती अभियान राबविण्यासाठी सुरु झालेल्या मोहिमेअंतर्गत गावात पाणी तपासणी करण्यासाठी निवड केलेल्या व संकेतस्थळावर नोंदविलेल्या ५ म हिलांची पडताळणी करणे, महिलांच्या पाणी गुणवत्ता विषयक एफटीके किट प्रशिक्षणाच्या नोंदी घेणे घरगुती नळ, अंगणवाडी, शाळा यांची पाणी नमूने तपासणी केली जाणार आहे.

यामुळे पाणी तपासणीत महिलांची भूमिका महत्वाची व निर्णायक ठरणार असून ही मोहीम गटविकास अधिकारी, आरोग्य विभागातील कर्मचारी, ग्राम सेवक यांनी गावागावात राबवावी, असे आवाहन पुलकीत सिंग यांनी केले. गावात आठवी ते दहावी मधील विद्यार्थ्यांना एफटीके किटद्वारे पाणी तपासणीचे प्रात्यक्षिक देणे, वर्ग ८ ते १० मधील विद्यार्थ्यांमार्फत शाळा, अंगणवाड्या, घरगुती नळ जोडण्याम धील पाणी नमूने तपासणी करणे, डब्यूक्यूएमआयएस पोर्टलवर नोंदी घेणे, नळ पाणी पुरवठा योजना स्त्रोत, घरगुती नळ जोडण्या, शाळा, अंगणवाड्यांची पाणी गुणवत्ता तपासणी करण्यासाठी रासायनिक व जैविक एफटीके किट वाटप करणे तसेच स्थानिकांना पाणी गुणवत्ता तपासणी व त्यापासून होणारे फायदे सांगितले जाणार असल्याचे प्रकल्प संचालक नूतन सावंत यांनी सांगितले.

# सर्वांसाठी घरे योजना बाबत शासन कटीबद्ध - मुख्यमंत्री फडणवीस

## मुख्यमंत्र्यांनी स्विकारली तब्बल १ हजार ५१ नागरिकांकडून निवेदने

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, नागपूर :** नागपूर महानगराम ध्ये अनेक वर्षांपासून स्वत:च्या मालकी हक्काचे घर व्हावे अशी इच्छा हजारो झोपडपट्टीधारकांची आहे. यापासून वंचित असलेल्या लोकांना पट्टे वाटपाच्या माध्यमातून हक्काचे घर मिळत आहेत. निकषाची पुर्तता करणारा एकही व्यक्ती हक्काच्या घरांपासून वंचित राहणार नाही. जे झोपडपट्टीधारक शासनाच्या निकषात मोडतात त्यांनी आपल्या हक्काच्या घरासाठी महानगरपालिका, नझूल विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. हैदराबाद हाऊस येथे आयोजित जनता दरबाराचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ७ वेगवेगळया झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या २१ झोपडपट्टी धारकांना प्राथमिक स्वरुपात पट्टे वाटप करून झाला. त्यानंतर त्यांनी जनतेची निवेदने स्विकारली. यावेळी विधान परिषद सदस्य संदिप जोशी, आम दार प्रवीण दटके, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीणा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, प्रभारी जिल्हाधिकारी प्रदीप कुलकर्णी, महामेट्रोचे महाव्यवस्थापक अनिल कोकाटे, आदी यावेळी उपस्थित होते.



सर्वासाठी घरे योजना-२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने नागपुर शहरामधील नझुलच्या जागेवरील ३३ झोपडपट्टीच्या प्रस्तावातील ३ हजार ७१४ झोपडपट्टी धारकांचे अतिक्रमण नियमानुकुल करण्यात आले आहे. आजवर मंजुर पट्टेपैकी २१५७ पी.टी.एस झोपडपट्टी धारकांना चलान देण्यात आलेले आहेत. परंतु सदर अकृषीक आकारणीची रक्कम चलानव्दारे भरणा केलेली नसल्याने वाटप करण्यास शिल्लक आहे. याबाबत शिबीर घेवून कार्यवाही केली जात आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय (महसुल विभाग) नागपूर कडुन १८ झोपडपट्टी पैकी तुकडोजी नगर, कामगार कॉलनी, भांडेवाडी या ३ झोपडपट्टयामध्ये एकुण १६० झोपडपट्टी धारकांना पट्टे वाटप करण्यात आले आहेत. ४७४ संबधित पट्टेधारकांनी चलानाची रक्कम शासन जमा केल्यानंतर पट्टा वाटप करण्यात येईल. याबाबत दिनांक २०.५.२०२५ रोजी शिबीर आयोजीत करण्यात येणार असल्याचे जिल्हा प्रशासनाने सांगितले.

उर्वरित चिंचभुवन, शामनगर, गिट्टीखदान, पन्नालाल देशराज नगर, आदिवासी नगर, पुनापुर, वाठोडा, भरतवाडा, हुडकेश्वर, कुराडपुरा, शोभाखेत, बिनाकी, कोष्टीपुरा, ठक्करग्राम व नारागाव या १५ झोपडपट्टीमध्ये ११२१ पट्टे वाटप करणे शिल्लक आहे. त्यापैकी २ झोपडपट्टी मध्ये पट्टे वाटपासाठी दिनांक १९ मे २०२५ रोजी जिल्हास्तरीय समि तीची बैठक आयोजीत करण्यात आलेली आहे.

### मुख्यमंत्र्यांनी स्विकारली तब्बल १ हजार ५१ नागरिकांकडून निवेदने

सर्वसामान्य नागरिकांना जनता दरबारातून आपले प्रश्न मार्गी लागतात असा लोकांचा विश्वास वाढीस लागला आहे. यासाठी जाणिवपूर्वक महिन्यातून एकदा जनता भेटीचा कार्यक्रम नागपूर मध्ये मुख्यमंत्री या नात्याने मी करतो. यात प्राप्त झालेल्या लोकांच्या निवेदनांवर गंभीरतेने विचार करून पात्र असलेल्या प्रत्येकाला न्याय मिळतो ही समाधानाची बाब असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

हैदराबाद हाऊस येथे आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबाराला नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. यात महिलांपासून वयोवृद्ध नागरिकांपर्यंत, तरुणांपासून दिव्यांग व्यक्तींना मुख्यमंत्र्यांची भेट घेवून त्यांना आपली निवेदने दिली. निवेदन देण्यासाठी येणाऱ्या नागरिकांचे उन्हापासून संरक्षण व्हावे यादृष्टीने भव्य मंडप व कुलर्सची व्यवस्था करण्यात आली होती. नागरिकांनी स्वयंशिस्तीचा प्रत्यय देत अप्रत्यक्षरित्या प्रशासन व शासकीय प्रणालीबाबतचा विश्वास दृढ केला. राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी अधिकारी व कर्मचारी समायोजन कृती समितीच्या शिष्ट मंडळानी भेट घेवून आपल्या मागण्याचे निवेदन दिले.

### महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतली भेट

माजी खासदार रामदास तडस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतली भेट घेतली. यात संत श्री संताजी महाराज आर्थिक विकास महामंडळ तातडीने सुरू करणे व त्यावर समाजाचे प्रतिनिधी नेमणे, पारंपारिक तेल घाणी उद्योगाच्या पुर्नविकासासाठी मध्यप्रदेश, झारखंड, राजस्थान राज्याच्या धर्तीवर महामंडळ स्थापन करणे, तेलघाणीतील सुटे तेल विक्रीवर शासनाचे निर्बंध उठवले आदी मागण्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केल्या. या शिष्टमंडळात म ाजी खासदार रामदास तडस, डॉ. भुषण कर्डिले, गजानन शेलार, संजय विभुते, बळवंतराव मोरघडे, पुष्पाताई बोरसे, अतुल वांदिले, जगदिश वैद्य, कुणाल पडोळे, प्रविण बावनकुळे, नरेंद्र सुर्यवंशी, भगवान बोरसे हे पदाधिकारी सहभागी होते.

# पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेत खरीप नियोजन बैठक

## शेतक-यांना कृषी निविष्ठांचा सुरळीत पुरवठा व्हावा, साठेबाजांवर कडक कारवाई करणार - पालकमंत्री ॲड. फुंडकर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, अकोला :** खरीपात शेतक-यांना बियाणे, खते आदी निविष्ठांचा सुरळीत पुरवठा व्हावा. कुठेही साठेबाजी होता कामा नये. साठेबाजी निदर्शनास आल्यास शासनाकडून कडक कारवाई केली जाईल, असा इशारा राज्याचे काम गार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे दिला. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेत जिल्हा खरीप नियोजनाबाबत बैठक नियोजनभवनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार अमोल मिटकरी, जिल्हाधिकारी अजित कुंभार, पोलीस अधिक्षक बच्चन सिंह, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांच्यासह विभागप्रमुख व तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. फुंडकर म्हणाले की, निविष्ठा विक्री व्यवहारात पारदर्शकता असावी. प्रत्येक कृषी केंद्रात खते, बियाणे आदी उपलब्धतेचे फलक लावावेत. शेतक-यांची फसवणूक होता कामा नये. लिंकेजचा आग्रह धरू नये. भरारी पथकांनी सजग राहून नियंत्रण ठेवावे. त्याचप्रमाणे, जिल्ह्यातील डीएपी खत आदी निविष्ठांची आवश्यकता राज्यस्तरीय खरीप आढावा बैठकीत म ांडून पाठपुरावा करण्याचे निर्देश त्यांनी दिले. ते पुढे म्हणाले की, जिल्ह्यात अद्यापपर्यंत पीक कर्जाचे ३९ टक्के वितरण झाले आहे.

वितरणाचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करावे. एकही पात्र शेतकरी वंचित राहता कामा नये. कृषी पंपाच्या वीज जोडण्यांचे काम संथगतीने होत असल्याने बॅकलॉग वाढत चालल्याच्या तक्रारी आहेत. या कामाला गती द्यावी. ज्या कंपन्या काम करत नाहीत, त्यांना काळ्या यादीत




टाकण्याचे निर्देश ही त्यांनी दिले.

उमरा सर्कलमध्ये शेतक-यांना फळपीक विम्यापासून वंचित ठेवल्याच्या, तसेच तिथे पंचनाम्याची प्रक्रिया सदोष असल्याच्या तक्रारी आहेत. त्याची तपासणी करून जबाबदार व्यक्तींवर कडक कारवाई करावी, तसेच शेतकरी बांधवांना सद्य:स्थितीत देय असलेले १५ हजार रू. द्यावेत व उर्वरित रक्कम त्यांना मिळण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा केला जाईल. अकोट तालुक्यातील ४ सर्कलमधील शेतक-यांना मदत निधी मिळण्याबाबत पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने विनासंमती शेतकऱ्यांचे कर्ज पुनर्गठन केल्याबाबतच्या तक्रारी आहेत. या संदर्भात संबंधितांवर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. त्याचा अहवाल त्वरित सादर करावा, असेही निर्देश त्यांनी दिले. घरगुती बियाणे वापराबाबत जागृती करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. कृषी विभागाच्या माहितीपुस्तिकेचे प्रकाशन ही यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते झाले.

# थोडक्यात

## बोर्डाच्या फेर मूल्यांकनामुळे तनुश्री चौरे पारनेर तालुक्यात प्रथम



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या श्री ढोकेश्वर विद्यालयातील विद्यार्थीनी तनुश्री दत्तात्रय चौरे हिचे शास्त्रीय कलेचे ए श्रेणी प्राप्त १५ गुण एस.एस.सी बोर्डाकडून ऑनलाईन निकाल लागला त्यावेळी न दिल्याने तनुश्री चौरेचा विद्यालयातील आणि तालुक्यातील प्रथम क्रमांक हुकला होता पण विद्यालयाने केलेला पत्रव्यवहार आणि वडील दत्तात्रय चौरे यांनी निकाल लागल्यानंतर सतत तीन दिवस पुण्याला जाऊन केलेला पाठपुरावा कामी आला. आणि तनुश्रीला अखेर शास्त्रीय कलेचे १५ गुण प्राप्त झाले. त्यामुळे तिची योग्यता आणि सर्वगुण संपन्नता अखेर सिद्ध झाली. तनुश्री दत्तात्रय चौरे ही विद्यालयात आणि पारनेर तालुक्यात ९८.२०% गुण मिळवून प्रथम आली. ज्ञानदा धुमाळ व श्लोक नरवडे हे दोन विद्यार्थी द्वितीय आले. तर ओंकार नरसाळे तृतीय आला.


या सर्व विद्यार्थ्यांना प्रभारी प्राचार्य बाळासाहेब खिलारी, माजी प्राचार्य सुनिल वाव्हळ, बाळासाहेब निवडुंगे, बाबासाहेब जाधव, निलम खिलारी, मल्हारी वाघसकर, सोनल रोहकले, रवींद्र ज्योतिक, रवींद्र मते, वर्षा भोंडवे, संदीप महांडुळे, नारायण शेळके, अतुल सैद, प्रसिद्ध तबला वादक स्वामी ठुबे सर यांनी मार्गदर्शन केले.

ढोकेश्वर विद्यालयात एिलमेंटरी आणि इंटरमिजिएट या चित्रकला परीक्षेचे केंद्र आहे. ढोकेश्वर विद्यालयाचे चित्रकला शिक्षक नारायण शेळके हे केंद्र चालवतात. ऐ ग्रेड मिळालेल्या विद्यार्थ्याला ७ गुण. बी ग्रेड मिळालेल्या विदयार्थ्याला ५ गुण आणि सी ग्रेड मिळालेल्या विदयार्थ्याला ३ गुण मिळत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी चित्रकला, खेळ आणि शास्त्रीय कला या क्षेत्रात आवडीनुसार सहभाग घेतला पाहिजे असे आवहान विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी केले.

विद्यालयातील इयत्ता १० वी च्या या सर्व यशस्वी विद्यार्थी आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे व प्रशासनाचे टाकळी ढोकेश्वर परिसरातील शिक्षण प्रेमी पालक, माजी विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

## डोंबिवली-कल्याण परिसरातील बार चालक त्रस्त

## माहिती अधिकाराचा गैरवापर करून पैशाची मागणी करणाऱ्या इसमाविरोधात तक्रार



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१७, कल्याण :** कल्याण परिसरातील बार चालकांनी एक गंभीर तक्रार पुढे आणली आहे. भगवान भुजंग नावाच्या एका इसमाने माहिती अधिकाराच्या धमकीखाली बार चालकांकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप बार मालकांनी केला आहे. २० हजार रुपये द्या नाहीतर माहिती अधिकारात अर्ज टाकतो, अशा प्रकारे धमकावत तो ब्लॅकमेल करत असल्याची तक्रार बार मालकांनी केली आहे.

बार चालकांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्या आहेत. परवाने, कर भरणा, आणि इतर आवश्यक बाबी काटेकोरपणे पार पाडल्या असूनही त्यांच्याकडून पुन्हा पैशांची मागणी केली जात आहे. फुकट दारू पिणे धमकी देणे असे प्रकार केले जाता आहेत आम्ही प्रामाणिकपणे व्यवसाय करतो, सर्व कायदे पाळतो, तरीसुद्धा अशा प्रकारच्या धमक्यांमुळे त्रास सहन करावा लागत आहे, असा आक्रोश बार मालकानी व्यक्त केला.

या प्रकरणाची तक्रार कल्याणच्या पोलीस उपायुक्त कार्यालयात करण्यात आली असून, संबंधित इसमावर योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी बार चालकांनी केली आहे. जर आम्हाला असेच त्रास दिले जात राहिले, तर व्यवसाय कसा करायचा? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

या प्रकारामुळे बार चालकांमध्ये रोषाचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

## शंभर दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेत

## विभाग स्तरावर जिल्ह्यातील ३ कार्यालयांना प्रथम क्रमांक




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, भंडारा :** शंभर दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिमेत विभाग स्तरावर सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या महाराष्ट्रातील तालुकास्तरीय शासकीय कार्यालयात भंडारा जिल्ह्यातील ३ कार्यालयांना प्रथम क्रमांक मिळाला आहे. तर आठ कार्यालयाने तृतीय क्रम ांक पटकावला आहे. जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते, उपविभागीय अधिकारी, गजेंद्र बालपांडे, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, यांनी या नेत्रदीपक कामगिरी बद्दल या सर्व कार्यालयांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

विभाग स्तरावर सर्वोत्कृष्ट कामगिरीत तालुका स्तरीय शासकीय कार्यालयात भंडारा जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त उप अधिक्षक, भूमी अभिलेख, साकोली, वन परिक्षेत्र अधिकारी, पवनी, उपविभागीय जलसंधारण अधिकारी, भंडारा, भंडारा या तीन कार्यालयांचा यात समावेश आहे.

तर तृतीय क्रमांक तहसिल कार्यालय, साकोली, उपविभागीय कृषी अधिकारी, साकोली, तालुका कृषी अधिकारी, पवनी, उप विभागीय पोलिस अधिकारी, साकोली, उप अभियंता (महावितरण) भंडारा शहर, सहायक निबंधक(सहकारी संस्था) मोहाडी, वैद्यकीय अधिक्षक, तुमसर, गट शिक्षण अधिकारी, पवनी, या कार्यालयांना मिळाला आहे.